# सान्या मल्होत्रा ऑस्ट्रेलियात करणार बवाल

आरती कडवद्वारे दिग्दर्शित व सान्या मल्होत्रा अभिनित मिसेसचा प्रीमियर आता इंडियन फिल्म फेस्टिव्हल ऑफ मेलबर्न २०२४ (आयएफएफएम) होणार आहे. या कार्यक्रमाला सान्या व आरती कडव या दोघीही विशेष उपस्थिती दर्शवणार आहेत. मिसेस हा चित्रपट एका महिलेच्या गुंतागुंतीच्या आयुष्यावर प्रकाश टाकतो. ही व्यक्तिरेखा अर्थातच सान्या मल्होत्राने साकारली आहे, जी एक प्रशिक्षित डान्सर व डान्स टीचर असते.

हा चित्रपट समीक्षकांद्वारे प्रशंसित मल्याळम् चित्रपट द ग्रेट इंडियन किचनचा हिंदी रिमेक आहे व यात कंवलजीत सिंग व निशांत दहिया यांच्या देखील मुख्य भूमिका आहेत. बावेजा स्टुडिओजच्या सहयोगाने जियो स्टुडिओजद्वारे प्रस्तुत मिसेसची निर्मिती ज्योती देशपांडे, पम्मी बावेजा व हरमन बावेजाद्वारे करण्यात आली आहे. सान्याने यापूर्वी न्यूयॉर्क फिल्म फेस्टिव्हलमध्येही आपल्या चित्रपटासाठी सर्वश्रेष्ठ अभिनेत्रीचा पुरस्कार पटकावला होता व आयएफएफएम २०२४ साठी सर्वश्रेष्ठ अभिनेत्री श्रेणीमध्ये नामांकन पटकावले आहे.

